# मैत्री शैषव व कुमार मुलांसोबत
# सातारा जिल्हयातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती

**प्रस्तावना-**

सातारा जिल्हयाची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३०,०३,९२२ असून प्राथमिक शिक्षण (१ ते ८ वर्ग) हे खालील व्यवस्थाननिहाय दिले जाते. (माहिती U-DISE वर्ष २०१४ प्रमाणे)

सातारा जिल्हयातील शैक्षणिक दृष्टिक्षेप (इ. १ ली ते ८ वी)

| अ.क्र. | तपशील | शाळा संख्या | विदयार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद शाळा | २७३२ | १५४७८७ |
| २ | नगर पालिका | ५२ | ७८२० |
| ३ | खाजगी अनुदानित मराठी माध्यम | ६६९ | १२२२४२ |
| ४ | खाजगी अनुदानित उर्दू माध्यम | ५ | ६२५ |
| ५ | विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित | ३१७ | ४९७१५ |
| ६ | स्वयंअर्थसहाय्यित | ३४ | २६३२ |
| ७ | एकूण | ३८०९ | ३३७८२१ |

जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण ८२.८७% असून पुरुष साक्षरता ८९.४२% व महिला साक्षरता ७६.३१% आहे. अनुसुचित जाती साक्षरता ७९.४६% व अनुसुचित जमाती साक्षरता ७३.०३% आहे. पुरुषाच्या तुलनेत महिलांमध्ये साक्षरता कमी असून अनुसुचित जाती महिलांमध्ये (७१.७५%) व अनुसुचित जमाती महिलांमध्ये (६६.२९%) हे प्रमाण अजून कमी आहे.

- **शैक्षणिक गुणवत्ता-**

जिल्हयातील शैक्षणिक पातळी पाहता सर्व सामान्य जनतेत शैक्षणिक स्तर वाढवायचा असेल तर प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने विविध संस्थानी सातारा जिल्हयातील शैक्षणिक गुणवत्तेचे अवलोकन केले असून त्याची आकडेवारी पाहिल्यास चित्र स्पष्ट होऊ शकते.

- **शैक्षणिक गुणवत्ता निकषः-**

१) विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे. (बौध्दिक, शारिरीक, मानसिक व सामाजिक विकास)

२) वाचन, लेखन व गणिती क्रिया या क्षेत्रात किमान कौशल्य प्राप्त करणे.

३) जिल्हयातील सर्व शाळांमध्ये काही बहुविकलांग, अंध व अंपग विदयार्थी वगळता सर्व विदयार्थ्यांनी त्या-त्या इयत्तेमधील वाचन, संख्याज्ञान, गणितीय क्रिया यामधील ' किमान कौशल्य ' प्राप्त करणे.

४) RTE-२००९ नुसार सर्व भौतिक निकषांची पुर्तता.

५) ग्रामविकास विभाग व माजी समृध्द शाळानुसार शाळांचे श्रेणीकरण.

६) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापननुसार श्रेणीकरण व अध्ययन-अध्यापन प्रक्रिया.

## A) ' असर ' अहवाल- (Annual Status of Education Report)

असर ही एक शैक्षणिक सर्वेक्षण करणारी एक संस्था आहे. सदर संस्था ही सर्व जिल्हयामध्ये सर्वेक्षण करते. एका जिल्हयामधून ३० गावांची निवड (randomly) केली जाते. ३० गावांमधून १ गाव randomly निवडून एका गावामध्ये (वाडयांपैकी / वस्त्यांपैकी) ४ वस्त्यांची निवड करुन सरपंचाना पत्र देऊन १ वस्तीतील ठराविक घरांची निवड सर्वेक्षणा करतात. सदर संस्था ५ ते १६ वयोगटातील मुलांचे सर्वेक्षण करतात. त्यामध्ये कुटुंबप्रमुखाचे नाव, कुटुंबातील एकूण लोक, जिल्हा परिषद शाळेत जाणारी मुले, खाजगी शाळेत जाणारी मुले किती याप्रमाणे सर्वेक्षण केले जाते. खाजगी क्लासला मुले जातात का? किती पैसे देतात? शैक्षणिक घरचे वातावरण, वर्तमान परिस्थितीचे सर्वेक्षण करतात.

**भाषा व गणित विषयासाठी खालील टप्प्यानुसार सर्वेक्षण करतात.**

| अ.क्र. | भाषा | अ.क्र. | गणित |
|---|---|---|---|
| १ | ० स्तरावरील मुले | १ | ० स्तरावरील मुले |
| २ | अक्षर ओळख असणारी मुले | २ | १ ते १० स्तर अंक ओळख |
| ३ | शब्दओळख असणारी मुले | ३ | ११ ते ९९ स्तर संख्या ओळख |
| ४ | सोपा परिच्छेद वाचणारी मुले | ४ | वजाबाकी |
| ५ | अस्खलितपणे समजपूर्वक वाचन | ५ | भागाकार |

**' असर ' अहवालानुसार निष्कर्ष**

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | वाचन, लेखन प्रगती | | संख्याज्ञान व गणितीय प्रगती | | महाराष्ट्र राज्यातील रँकींग |
|---|---|---|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र | सातारा जिल्हा | महाराष्ट्र | सातारा जिल्हा | |
| १ | २०११-१२ | ७८.६% | ८८.९०% | ५४.८५% | ६९.५% | ४ |
| २ | २०१२-१३ | ७१.४५% | ८७% | ५१% | ६४.३% | ५ |
| ३ | २०१३.१४ | ७१.९५% | ८६.०५% | ४९.३५% | ६४.५% | ७ |
| ४ | एकूण | ७४% | ८७.३१% | ५१.७३% | ६६.१०% | ५ |

उपरोक्त चार्टचे अवलोकन करता सातारा जिल्हयाची वाचन, लेखन व गणितातील प्रगती राज्याच्या सरासरीपेक्षा जास्त आहे.

## B) SLASH REPORT- (महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे)

महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये इ. ५ वी च्या वर्गाची स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा व खाजगी शाळांची ' मराठी व गणित ' विषयांची नमुनेदाखल (Randomly) चाचणी घेण्यात आली त्यामध्ये राज्याची प्रगत विदयार्थ्यांची संपादणूक टक्केवारी मराठी- ५३.४८% व गणिताची संपादणूक टक्केवारी ५०.७६% इतकी आहे. दोन्ही विषयातील सातारा जिल्हयाची संपादणूक टक्केवारी ही राज्याच्या संपादणूकीपेक्षा जास्त असल्याचे निदर्शनास आले.

**C) ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांच्या गुणवत्तेचा विकास कार्यक्रम** शासन दि.७/१/२०१३ च्या शासन निर्णयानुसार समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण हे आवश्यक असून, देशातील बहुतांशी समाज ग्रामीण भागात रहात असल्याने देश व राज्य यांच्या विकासासाठी शहरी भागातील शिक्षणाबरोबरच ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचा गुणवत्ता विकास कार्यक्रम खालीलप्रमाणे राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सातारा जिल्हयाची स्थिती गुणांकन व महत्वाच्या बाबी:- १) शाळेचे मुद्देनिहाय गुणांकन करुन त्याप्रमाणे दर्जा ठरविल्यास शाळेच्या विकासाच्या चांगल्या संधी निर्माण होऊन ग्रामीण शैक्षणिक प्रगतीस वाव मिळेल हा मुख्य उद्देश आहे. यामध्ये

| अ.क्र. | तपशिल | गुण | सारांश |
|---|---|---|---|
| १ | शालेय व्यवस्थापन | ७५ | ३७.५% |
| २ | लोकसहभाग | १२ | ६.०% |
| ३ | शैक्षणिक संधीची समानता | १३ | ६.५ |
| ४ | शैक्षणिक गुणवत्ता | १०० | ५०% |
| | एकूण | २०० | १००% |

वरील गुणांच्या आधारे शाळेचे वर्गीकरण करावयाचे असून ते खालीलप्रमाणे राहील.

| श्रेणी | अ | ब | क | ड | ड |
|---|---|---|---|---|---|
| २०० पैकी प्राप्त गुण | ९० ते १००% | ८० ते ८९% | ६० ते ७९% | ४० ते ५९% | ० ते ३९% |

सदर शासननिर्णयानुसार शाळांचे व विदयार्थ्यांचे मूल्यांकन वर्षातून एकदा केले जाते. सदर मूल्यांकन करण्यासाठी तालुकास्तरवर व जिल्हास्तरावर समिती गठित करण्यात आलेली आहे. शाळांचे मूल्याकंन खालील कालावधीत केले जाते.

| अ.क्र. | स्तर | मूल्यांकन कालावधी | बक्षीस वितरण |
|---|---|---|---|
| १ | तालुकास्तर | दि.१ जानेवारी ते २० जानेवारी | २६ जानेवारी |
| २ | जिल्हास्तर | दि. १ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी | १ मे |

मूल्यांकन करुन श्रेणी निश्चित केल्यानंतर विविध स्तरावरील तालुका व जिल्हा पातळीवरील प्रथम, व्दितीय, तृतीय असे वर्ग करुन त्यांना खालील प्रमाणे पारितोषिके दिली जातात.

| अ.क्र. | स्तर | प्रथम क्रमांक | व्दितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | तालुकास्तर | ५,००० | ३,००० | २,००० |
| २ | जिल्हास्तर | १०,००० | ७,५०० | ५,००० |

सातारा जिल्हयाची शैक्षणिक वर्ष २०१४-१५ ची अंतिम स्थिती

| एकूण शाळा संख्या | अ | ब | क | ड | इ |
|---|---|---|---|---|---|
| २७३२ | १९१ | १३५० | ११८५ | ६ | ० |

**D) शाळांच्या इमारतीची स्थिती-**

प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांची गुणवत्ता जरी चांगली असली तरी, शाळेच्या इमारतीची स्थिती ही मुलांना शाळेत येण्यासाठी प्रेरणादायी ठरु शकते. सन २०१५-१६ मध्ये जिल्हा नियोजन समितीच्या तरतुदीतून एकूण ७७ शाळांना १,८६,५०,०००/- रुपये दुरुस्ती / संरक्षक भिंत यासाठी दिले. जि.प. सेस मधून सन २०१५-१६ मध्ये एकूण ६०,००,०००/- रुपये २९ शाळांना दुरुस्ती / संरक्षक भिंत यासाठी दिलेले आहे. सन २०१६-१७ च्या सुधारित अंदाजपत्रकात ४.५० लक्ष अनुदान जिल्हा नियोजन समितीकडे शाळा दुरुस्ती / सरंक्षक भिंत यासाठी मागणी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | बांधकाम प्रकार | भौतिक गरज | आवश्यक निधी (लक्ष) | उपलब्ध निधी (लक्ष) | निव्वळ गरज (लक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | शाळा दुरुस्ती | २६६ | ६४९ | २६५ | ३८४ |
| २ | वॉल कंपाऊंड | ७६१ | २८८३ | ० | २८८३ |
| ३ | वर्ग खोल्या | ४१९ | २७२३ | ० | २७२३ |
| | एकूण | १४४६ | ६२५५ | २६५ | ५९९० |

**E) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम-** प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम सन २०१५-१६ पासून राज्यात सुरु करण्यात येत आहे. त्याअंतर्गत राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या मान्यताप्राप्त शाळांमधून इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विदयार्थ्यांसाठी प्रथम भाषा व गणित विषयाच्या शैक्षणिक प्रगती चाचण्यांचे आयोजन करण्यात येत आहे.

- सर्व नियमित विदयार्थ्यांना किमान अपेक्षित क्षमता अवगत असायलाच हवी याबाबत सर्व विदयार्थ्यांच्या क्षमता संपादणूकीची खात्री शैक्षणिक प्रगती चाचणीव्दारे केली जाणार असून या क्षमतामध्ये एकही मूल अप्रगत राहणार नाही यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी शासन, प्रशासन व शालेय व्यवस्थापन विशेष प्रयत्न करणार आहे.
- गुणवत्ता तपासणे आणि सुधारणे हा या चाचण्यांचा हेतू आहे.
- राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणामध्ये मुलभूत क्षमतांबरोबर संबंधित इयत्तेच्या अपेक्षित सर्व क्षमतांच्या प्रगतीबाबत तपासणी केली जाईल. यादृच्छिक पध्दतीने होतील.

**शैक्षणिक प्रगती चाचण्यांचे स्वरुप**

लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक अशा तीनही प्रकारच्या प्रश्नांचा समावेश चाचण्याचा भारांश - दि.२०/०८/२०१० च्या शासन निर्णयातील संकलित मूल्यमापनाच्या भारांशाप्रमाणे

**चाचणी क्र. १**

- इयत्ता २ ते ८ च्या सर्व विदयार्थ्यांसाठी
- मागील इयत्तेपर्यंतच्या मुलभूत क्षमता
- विदयार्थ्यांची स्तरनिश्चिती करुन गुणवत्ता कार्यक्रम आखण्यासाठी चाचणीचा उपयोग.

**चाचणी क्र. २**

- इयत्ता १ ते ८ च्या सर्व विदयार्थ्यांसाठी
- मुलभूत क्षमता आणि पहिल्या सत्राअखेरपर्यंतच्या क्षमतांवर आधारित प्रश्न.

**चाचणी क्र. ३**

- इयत्ता १ ते ८ च्या सर्व विदयार्थ्यांसाठी
- मुलभूत क्षमता, पहिल्या आणि दुस-या सत्राअखेरपर्यंतच्या क्षमतांवर आधारित प्रश्न.

**त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने घ्यावयाच्या चाचण्या-**

- शिक्षक, अधिकारी, त्रयस्थ संस्था प्रतिनिधी यांच्या सहभागाने दोन चाचण्या
- संकलित मूल्यमापन एकच्या वेळेस व संकलित मूल्यमापन दोनच्या वेळेस या चाचण्या यादृच्छिक पध्दतीने निवडलेल्या शाळांमध्ये होतील.

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम (पायाभूत चाचणी)**

| अ.क्र. | जि.प. शाळांची संख्या | पायाभूत चाचणी २०१५ | | | अप्रगत विद्यार्थी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १०० टक्के प्रगत शाळा संख्या | १०० टक्के प्रगत शाळा संख्या टक्केवारी | परीक्षेस बसलेले फक्त जि.प. विद्यार्थी | भाषा | गणित | भाषा टक्के | गणित टक्के |
| १ | २७३२ | ७९४ | २९.०६ | ११८५४२ | १००८३ | ७८८१ | ८.५१ | ६.६५ |

- **शिष्यवृत्ती परीक्षा :-**

१. जिल्हा परिषद प्राथमिक शाळामधील शिष्यवृत्ती धारक विदयार्थ्यांचे प्रमाण वाढावे या करीता दरवर्षी शिक्षकांचे उपद्बोधन वर्ग घेण्यात येतात.

२. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये राज्यस्तर गुणवत्ता यादीत ४ थी व ७ वी चे एकूण १५ विदयार्थी पात्र ठरले होते. तर शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये एकूण ३१ विदयर्थी पात्र झाले आहेत.

३. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये इ. ५वी व ८ वी साठी शिष्यवृत्ती परीक्षा घेण्याचे धोरण ठरले असल्याने यावर्षी शिष्यवृत्ती परीक्षा होणार नाही.

४. या शिष्यवृत्ती परीक्षेच्या धर्तीवर इ. ४ थी व ७ वी करीता यावर्षी सातारा जिल्हा परिषदेच्या मार्फत सातारा जिल्हा प्रज्ञा शोध परीक्षा घेण्यात येणार आहेत.सदर यशाचे रहस्य म्हणजे निवडक मुलांसाठी सेमी गुरुकुल पध्दतीने मुलांची तयारी करुन घेतली जाते.

**सेमी इंग्रजी** :- जिल्हा परिषदेच्या एकूण २७३२ शाळांपैकी ७३८ शाळामधून सेमी इंग्रजी सुरू करण्यात आले आहेत.

- **क्रीडाप्रबोधिनी उपक्रम-**

- शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये क्रीडा प्रबोधिनीसाठी जिल्हा परिषद सातारा च्या एकूण १६२ विदयार्थ्यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्राचा विचार करता एकूण निवडलेल्या २४१ विदयार्थ्यांमध्ये सातारा जिल्हयाचे १६२ विदयार्थी असून त्याचे एकूण प्रमाणे ६७ टक्के इतके आहे.
- सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये शासनाची क्रीडा प्रबोधिनी चाचणी झाली नाही..
- २०१४-१५ मध्ये चाचणीचे नविन निकष अंमलात आले असून त्यानुसार जिल्हास्तरापर्यंतच्या निवड चाचण्या झालेल्या आहेत.जिल्हयातील एकूण ७२ विदयार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये राज्यस्तरावर जिल्हयातील ४० विदयार्थ्यांची निवड झाली.राज्यस्तरावर महाराष्ट्रातून ४८ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.महाराष्ट्राचा विचार करता जिल्हयातील विदयार्थ्यांचे प्रमाण ८३.६९ इतके आहे.

**योग प्रशिक्षण व यशोगाथा-**

**योगासन :-** योगाचे प्रशिक्षण झालेल्या शिक्षकांचे गट आहेत. जि. प. च्या सर्व शाळांमध्ये शारीरिक शिक्षणाच्या तासांना व प्रत्येक शाळेमध्ये दर शनिवारी स. ८.०० ते ८.३० या वेळेत योगासने घेतली जातात. जि. प. प्रा. शाळा कारी, ता. सातारा येथे मुलींना योगासनामध्ये विशेष प्राविण्य मिळविले आहे व ते राज्य व देश स्तरापर्यत पोहचले आहे. तसेच दोरी मल्लखांब सराव घेतात. त्या मुली परिसरातील कुमठे गटामधील ४० शाळांमध्ये मार्गदर्शन करतात. विविध स्पर्धेत यश मिळवतात. सदर क्रीडा व योगचे यश अबाधित राहण्यासाठी प्रत्येक तालुक्यात क्रीडा व योग समन्वयक यांची नेमणूक केली असुन शाळा शिकवण्याव्यतिरिक्त हे शिक्षक या बाबतचे प्रशिक्षण व सराव घेतात.

➢ **आयटीमध्ये शिक्षकांची गुणवत्ता-** तंत्रस्नेही शिक्षकांच्या कार्यशाळांचे आयोजन करुन त्यामध्ये खालील विषयांचे मार्गदर्शन करणेसंदर्भात नियोजन करण्यात आले आहे.

संगणकाचे भाग व संगणक वापरतेवेळी घ्यावयाची काळजी.

- संगणक बंद असवस्थेत असेल तर चालू करण्यासंबंधी जुजबी ज्ञान व माहिती (हार्डवेअर)
- मराठी टायपिंग (गुगल इनपूट टूल)
- पी.पी.टी. तयार करणे व वापरणे (How to make an educational ppt)
- शैक्षणिक व्हीडीओ तयार करणे व त्याचा वापर
- यु-टूबचा शैक्षणिक वापर
- Google Earth चा शैक्षणिक वापर
- शाळेची मोफत ब्लॉगसाईट तयार करणेसाठी मार्गदर्शन
- ई-मेल तयार करणे व वापरणे विषयी मार्गदर्शन
- पेंट, वर्ड व एक्सेलचा शैक्षणिक वापर

➢ **ज्ञानररचनावाद पार्श्वभूमी-** मूल हे ज्ञानाचा रचयिता असते. त्यामुळे मुलांची शिकण्याची नैसर्गिक इच्छा व पध्दती यांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक ठरते. मूल स्वतः ज्ञानाची रचना करु शकेल असे अध्ययन अनुभव मुलांना दयावयाचे असतील तर आपल्या अध्ययन अध्यापन पध्दतीत सुधारणा करावी लागतील. सध्याच्या पारंपारिक शिक्षक केंद्रित पध्दतीत विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन सहजपणे करणे शक्य होत नाही. त्यामुळे कृतिकेंद्रित, विदयार्थिकेंद्रित, ज्ञानरचनावादी दृष्टिकोनातून आपण विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास हातभार लावू शकतो.

➢ **ज्ञानरचनावाद :-** संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ज्ञानरचनावाद पद्धतीने अध्ययन अध्यापन प्रक्रिया यशस्वीपणे राबविणारा जिल्हा म्हणून सातारा जिल्हा ओळखला जातो. सातारा जिल्हयातील वाई तालुका व कुमठे बीटामध्ये

ज्ञानरचानावादी अध्ययन अध्यापन पद्धती सुरू झाली. या पद्धतीने विदयार्थ्यांचा सर्वांगिण विकास लवकर होऊन मिळालेल्या ज्ञानाचे दृढीकरण व उपयोजन वेगाने होण्यास मदत होते. ज्ञानरचनावादामध्ये खालील मुद्दयांचा समावेश होतो.

- ज्ञान हे स्थितिशील नसून गतिशील आहे.
- पूर्वानुभवाच्या आधारे विदयार्थी ज्ञानरचना करतात.
- सामाजिक, भाषिक व सांस्कृतिक आंतरक्रिया हा माहितीचा प्रमुख स्त्रोत असतो व याद्वारे ज्ञानाची निर्मिती होते.
- स्थानिक परिसराचा / परिस्थितीचा विदयार्थ्यांच्या ज्ञानरचनेत महत्त्वाचा वाटा असतो.
- उदा. इ. १ ली पासून विदयार्थी झाडाविषयी शिकतात. शाळेत यायच्या आधी अनेक विदयार्थ्यांना झाडाला पाने असतात, पानांचा रंग हिरवा असतो हे माहित असते. एखादया छोटयाशा फांदीचे निरीक्षण करुन, पानांचा, फुलांचा, खोडांचा, आकार, रंग, रुप, वास, स्पर्श इतर वैशिष्टये यांच्या नोंदी करुन विदयार्थी अतिशय कमी वेळा खूप जास्त माहिती मिळवू शकतात.ज्ञान हे एकात्मिक आहे. त्यामुळे एका छोटया फांदीच्या निरीक्षणातून विदयार्थी भाषा, गणित, विज्ञान इत्यादी सर्वच विषयांचे अध्ययन करु शकतात.
- सातारा जिल्हयातील सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व शिक्षकांचे ज्ञानरचनावाद आधारित अध्ययन-अध्यापन करणेबाबत प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे.
- सद्यःस्थितीत सातारा जिल्हयामध्ये एकूण १३७८ जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ज्ञानरचनावादी पद्धतीने अध्ययन-अध्यापन प्रक्रिया राबविली जाते.

➢ **विदयार्थी व्यक्तिमत्व विकास स्पर्धा-** यामध्ये जिल्हापरिषदे तर्फे जिल्हा परिषद शाळांतील विदयार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, बालनाटय स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, हस्तलिखित मासिक स्पर्धा इत्यादी स्पर्धेचे तालुका व जिल्हास्तरावर घेण्यात येतात.

➢ **सांस्कृतिक-** विदयार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी ' बालआनंद मेळावा ' आयोजित केला जातो. प्रत्येक केंद्राअंतर्गत बालआनंद मेळावा आयोजित करण्यात येत असून त्यामध्ये प्रत्येक शाळेने सहभाग नोंदविणे आवश्यक असते. यामध्ये विदयार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच चित्रकला, रांगोळी, कार्यानुभव साहित्य, चर्चा, वादविवाद, फनी गेम्स यांचेही आयोजन करण्यात येते. यासाठी प्रतिकेंद्र १५ हजार अनुदान दिले जाते.

➢ **स्व. यशवंतराव चव्हाण क्रीडा स्पर्धा-** शरीमाद्दं खलु धर्मसाधनम् ! या संस्कृत सुवचनाप्रमाणे जर शरीर चांगले तर इतर सर्व काही करता येते. म्हणूनच सातारा जिल्हा परिषदेने विदयार्थ्यांचे शरीर सदृढ व्हावे याकरीता दरवर्षी स्व. यशवंतराव चव्हाण बालक्रीडास्पर्धा आयोजित केल्या जातात.

➢ **विज्ञान प्रदर्शन व प्रयोगशाळा-** जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये ' यशवंत प्रयोगशाळा ' निर्माण करण्यात आल्या असून त्याची परिणामकारकपणे अंलबजावणी होण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ' यशवंत प्रयोगशाळा ' नावाची

समिश्र पुस्तिका देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या इन्स्पायर अॅवॉर्ड या वैज्ञानिक प्रदर्शनात जिल्हा परिषदेच्या सर्व उच्च प्राथमिक शाळांनी सहभाग नोंदवला असून राज्यस्तरीय प्रदर्शनात जिल्हयातील ७ शाळांची निवड झाली आहे. मागील वर्षी बोधे ता. माण येथील विदयार्थींनी कु. जगदाळे हीची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड झालेली होती.

- **वाचनालय-** जिल्हा परिषदेच्या २७३२ शाळांमध्ये ' ज्ञानचक्षु ' वाचनालयाची निर्मिती करण्यात आली असून सर्व शाळांना ' ज्ञानचक्षु ' वाचनालय ही माहिती पुस्तिका जिल्हा परिषदेकडून पुरविण्यात आली आहे. सर्व शाळांमध्ये वाचनालयाचा प्रभावीपणे वापर व अंमलबजावणी होत आहे.

- **शैक्षणिक साहित्य :-**

१. जिल्हयातील सर्व शाळेमध्ये शैक्षणिक साहित्यांची योग्य प्रमाणात उपलब्धता आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई, महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद यांचे मार्फत चार्टस, ग्रीनबोर्ड, अध्ययन कार्डस, गणित, इंग्रजी व विज्ञान पेटी, पृथ्वी गोल, कार्यानुभव पेटी, इत्यादी शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आलेले आहे.

२. दरवर्षी सर्व शिक्षा अभियान (S.S.A. )मधून शिक्षक अनुदान मिळते त्यातून शिक्षक स्वतः शैक्षणिक साहित्याची निर्मिती करतात.

३. S.S.A. अनुदान, वेतनेत्तर अनुदान तसेच लोकसहभागातून आवश्यक शैक्षणिक साहित्य शाळास्तरावर उपलब्ध करून घेतले जाते.

- **डिजीटल क्लासरूम :-**

जिल्हा परिषदेच्या एकूण २७३२ शाळा असून त्यापैकी डिजीटल क्लासरूम उपलब्ध असणाऱ्या शाळांची संख्या खालील प्रमाणे :-

| जि. प. च्या एकूण शाळा | जि. प. सेस व जिल्हा नियोजन समिती कडून उपलब्ध | लोकसहभाग व कंपनी C.S.R. मधून | एकूण | उरलेल्या शाळा संख्या |
|---|---|---|---|---|
| २७३२ | ५३८ | २२८ | ७६६ | १९६६ |

- **आनापान :-** जिल्हयतील साधारणपणे ४०० शिक्षकांचे आनापान शिबीर (प्राशिक्षण) झालेले आहे. त्याुना केंद्रसंमेलनामधून सर्व शिक्षकांना आनापान विषयी प्रशिक्षण केलेले आहे. जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमधून परिपाठाच्या वेळी सकाळी ९ ते १० मिनीटे मौन पाळून आनापानचा सराव घेतला जातो.

- **पटतफावत :-** दरवर्षी जि. प. शाळांच्या पटात घट होते. परंतू घट स्थिर राहण्यासाठी प्रयत्न केला जातो.

| शैक्षणिक वर्ष | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ |
|---|---|---|---|---|---|
| विदयार्थी संख्या | १८२५९६ | १७५५३६ | १६५०२६ | १५७८०० | १५४७८७ |
| मागील वर्षाच्या तुलनेत पटातील घट | ९३५५ | ७०६० | १०५१० | ७२२६ | ३०१३ |

- **यशस्वी शाळा :-** वरील प्रमाणे जिल्हा परिषदेच्या शाळेतील पट कमी होत असला तरी जि. प. च्या काही शाळांमध्ये दर्जेदार शिक्षणामुळे व सुविधेमुळे खाजगी शाळेपेक्षा जादा पट व ओढा जि. प. शाळांकडे आढळून येतो. त्यापैकी काही शाळा खालील प्रमाणे आहेत.

१. जि. प. शाळा कोडोली - पट ९२७

   a. कोल्हापूर शिक्षण विभागातील सर्वात मोठी जि. प. प्राथ. शाळा

   b. प्रशस्त इमारत व क्रीडांगण

   c. शहरालगत व इतर खाजगी प्राथमिक शाळा असूनही या शाळेतील विदयार्थ्यांचे प्रवेशाचे प्रमाण चांगले आहे.

२. सेमी गुरूकुल, संगणक प्रयोगशाळा, भरपूर खेळसाहित्य, डिजीटल क्लासरूम, प्रार्थना हॉल, प्रशस्त क्रीडांगण, यशवंत प्रयोगशाळा, ज्ञानचक्षु वाचनालय, तज्ज्ञ व अनुभवी शिक्षक यामुळे शाळा नावारूपाला आली आहे.

३. शिष्यवृत्ती, नवोदय विदयालय, सातारा जिल्हा प्रज्ञाशोध परीक्षा यामध्ये दरवर्षी विदयार्थी चमकतात.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेढा, ता. जावली एकूण पट :- ६५२

१. सातारा जिल्हयातील पटाच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाची शाळा

२. तज्ज्ञ, अनुभवी व उत्साही शिक्षकवर्ग

३. संगणक कक्ष, बुद्धीबळ कक्ष, ज्ञानचक्षु वाचनालय, डिजीटल क्लासरूम, यशवंत प्रयोगशाळा व इतर भौतिक सुविधेने समृद्ध शाळा.

४. दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय विदयालय परीक्षा, सातारा जिल्हा प्रज्ञाशोध परीक्षा, व्यक्तीमत्व विकास स्पर्धेत या शाळेतील विदयार्थी चमकतात. यावर्षी या शाळेचे एकूण २१ विदयार्थी शिष्यवृत्ती धारक झाले आहेत.

याचप्रमाणे असलेल्या इतर शाळा जि. प. प्रा. शाळा नागठाणे, ता. सातारा, वाघेश्वर, तासवडे, खोडशी ता. कराड, जि. प. प्राथ. शाळा खंडाळा, जि. प. मुलींची शाळा शिरवळ, ता. खंडाळा, जि. प. प्राथ. शाळा निकमवाडी, ता. वाई, मामुर्डी, कुडाळ, ता. जावली, जि. प. शाळा मेतगुताड, ता. महाबळेश्वर, जि. प. शाळा हिंगणगाव, ता. फलटण, जि. प. प्राथ. शाळा कोरेगांव नं. २, जि. प. शाळा कृष्णानगर, ता. सातारा इत्यादी शाळांमध्ये पट संख्या टिकून आहे.

- **जिल्हा परिषद शाळेसमोरील आव्हाने-**

- घटती पटसंख्या
- सेमी इंग्रजी व सीबीएसई / आयसीएसई चे पदार्पन.
- रयत शिक्षण संस्थेतील बदल.

- **त्यासाठी केलेले उपाय-**

- ज्ञानरचनावाद
- सेमी गुरुकुल
- क्रीडा प्रबोधिनी
- शैक्षणिक साहित्य
- Whatsapp Groups
- I.T. Websites

- C.S.R. Activiry
- शैक्षणिक सहल व परिसर भेटी

➢ **शैक्षणिक सहल व परिसर भेटी** :- जिल्हा परिषद शाळामध्ये सर्व सामान्य कुटुंबातील विदयार्थी असतात. त्यामुळे मोजक्याच शाळा या इतर ठिकाणी सहली काढतात. तथापी जवळच्या अंतरावर व परिसरामध्ये सहली काढून त्यानुसार ज्ञान ग्रहन करणे व अभ्यास करणे सर्वांनाच शक्य आहे. त्यानुसार खालील प्रमाणे सहली व परिसर भेटी देणे या शैक्षणिक वर्षापासून अपेक्षित आहे. केवळ भेटी देऊन परिसर पहाणे हा उद्देश न ठेवता जे पाहिले ते निरीक्षण करून त्यांचा नोंदी शिक्षकांच्या मदतीने ठेवाव्यात व त्यातून ज्ञानाची वृद्धी करावी हा उद्देश आहे. तसेच ग्रामीण भागातील बहुतांश मुले शेतकरी कुटुंबातील असतात. आधुनिक पद्धतीने शेती करणे, बँकव्यवहार, विविध कार्यालयातील भेटी द्वारे कामकाजाची माहिति करून दिली जाते. याचा त्यांना भविष्यात फायदा होणार आहे.

➢ **सेंद्रिय शेती व परिसर भेटी :-** गावातील सेंद्रिय शेती व सेंद्रिय गुऱ्हाळ, पॉलिहाऊस, प्रगत शेती, डेअरी फार्म शेतीवर आधारित इतर उद्योग यांना दोन महिन्यातून एकदा भेटी देऊन त्यांचे अहवाल लेखन करणे. परसबाग लागवड,वनऔषधी,घरीच तयार करु शकणारी खते,सेंद्रीय किटकनाशके यावर जास्त भर आहे.

➢ **बँक-पोस्ट :-** गावातील अथवा जवळच्या गावातील बँक - पोस्ट ऑफिसला भेट देऊन त्यांचे कामकाज कसे चालते पैसे काढणे - पैसे भरणे, एटीएम, कार्डची सुविधा, बँकेचे - पोस्टाचे व्यवहार कसे चालतात याची माहिति घेणे, पत्रांचा प्रवास - पत्रांचे विवरण (सॉर्टिंग) या विषयी माहिति घेणे. बचतीच्या योजनांची माहिती घेऊन स्वतःला व पालकांना बचतीविषयी प्रोत्साहित करणे व त्यांचे अहवाल लेखन शिक्षकांच्या मदतीने करणे. वर्षातून प्रत्येक शाळेचे किमान १ भेट करणे अपेक्षित.

➢ **शासकीय कार्यालये यांना भेटी :-** ग्राम पातळीवरील तलाठी,ग्रामसेवक,अंगणवाडी कार्यालय,तहसिल,पंचायत समिती,पोलीसठाणे येथे भेटी देण्याचे नियोजन या कार्यक्रमा अंतर्गत योजले आहे.त्यामुळे मुलांमध्ये लहान वयातच आत्मविश्वास व परिसर भेटीतुन ज्ञानरचनावाद होणे अपेक्षित आहे.

➢ **लघुउद्योग व कारखान्यांना भेटी :-** शाळेच्या जवळ अथवा जवळच्या गावात असलेल्या लघुउदयोगांना व कारखान्यांना भेटी देऊन तेथील कामकाज कसे चालते याविषयी माहिति घेणे व अहवाल लेखन शिक्षकांच्या मदतीने करणे उदा. घोंगडी कारखाने , हातमाग, यंत्रमाग, साखर कारखाने, बिस्किट गोळया यांचे कारखाने, सुतारकाम, लोहार काम, शेती औजारे उद्योग, साखर कारखाने इत्यादी

➢ **DIET ची भूमिका-** शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी जिल्हा स्तरावर डाएट ही प्रमुख संस्था असून शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन व नाविण्यपूर्ण उपक्रम संदर्भाने डाएटची भूमिका पुढीलप्रमाणे आहे.

१. जिल्हयातील शिक्षकांची नाविण्यपूर्ण उपक्रमांची माहिती घेणे. त्याची गुणवत्ता व उपयोगिता ठरविणे. त्याचे तपशिलवार विवरण तयार करणे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे.

२. जिल्हयात विदयापरिषदे मार्फत मान्य प्रशिक्षणाचे वेळापपत्रक नियोजित पध्दतीने राबविण्यात येत आहे किवा कसे याबाबत अदययावत माहिती ठेवणे, प्रशिक्षणाची गुणवत्ता राखण्यासाठी उपाय योजना करणे प्रत्येक प्रशिक्षण संपल्यानंतर त्याचा मुल्यांकन अहवाल प्राचार्य डाएट यांनी संचालक, विदया परिषद यांना सादर करावा.

३. शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणा-या शैक्षणिक योजनांची गुणवत्ता नियंत्रणासह प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी विभागाच्या विविध यंत्रणेशी समन्वय साधून प्रयत्न करणे.

## ➢ शिक्षकांचे सक्षमीकरण (Teachers Quality)

**१. शिक्षक व्यक्तीमत्व विकास स्पर्धा :-**

a. जिल्हा परिषदे मार्फत बीट , तालुका व जिल्हा स्तरावर शिक्षकांसाठी क्रिडास्पर्धेचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये धावणे, व्हॉलीबॉल, कब्बड्डी, खो-खो, क्रिकेट, रिले, लांबउडी, उंचउडी, गोळाफेक इत्यादी स्पर्धांचा समावेश असतो.

b. शिक्षकांच्या सांस्कृतिक स्पर्धा :- यामध्ये फक्त शिक्षकांसाठी समूहगीत गायन स्पर्धा, लोकनृत्य, इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

c. शैक्षणिक P.P.T. स्पर्धा :- यामध्ये शिक्षकांचे PPT द्वारे अध्यापन तासिकांची स्पर्धा बीट, तालुका व जिल्हा स्तरावर घेण्यात येतात.

➢ **आपले आरोग्य आपल्या हाती :-** आजारी पडून डॉक्टरांकडे जाण्यापेक्षा आजारी पडू नये म्हणून काळजी घ्यावी. त्यासाठी महिला शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात असून त्यांच्यामार्फत मुलांना माहिती दिली जाते.आहार,व्यायाम,हवा,पाणी,वायू,सुर्यप्रकाश यांचा आरोग्याशी संबध यावर भर दिला जातो.

➢ **लोकसहभाग :-** शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये जि. प. प्राथमिक शाळांच्या लोकसहभाग रोख , वस्तुस्वरूपात व भौतिक सुविधा स्वरूपात १ कोटी ५२ लक्ष रुपये इतका होता. तो शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ८.७१ रु. कोटीच्या दरम्यान झाला आहे. एकूण ४०० टक्के वाढ लोकसहभागामध्ये गेल्या ३ वर्षामध्ये झाली आहे.

| अ.क्र. | वर्ष | लोकसहभाग मूल्य | स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | १.५४ कोटी | लोकसहभागातून वस्तुरुपाने, बांधकामरुपाने व रोख स्वरुपात मदत मिळते. उदा. डिजीटल क्लासरुम, संगणक, वर्गखोली, स्वच्छतागृह, शाळादुरुस्ती, विदयार्थ्यांना मदत इ. |
| २ | २०१२-१३ | ३.१० कोटी | |
| ३ | २०१३-१४ | ६.३५ कोटी | |
| ४ | २०१४-१५ | ८.७१ कोटी | |